: प्रेषक :

## डॉ. महादेव गव्हाणे

प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर
फोन : ०२३८२ - २४५९३३, फॅक्स : २५३६४५
Website : www.shahucollegelatur.org.in
E-mail: principal@shahucollegelatur.org.in

### : संयोजन समिती :

**प्रा. एस. एन. शिंदे**
उपप्राचार्य

**प्रा. जयराज गंगणे**
पर्यवेक्षक

**डॉ. भीमराव पाटील**
प्रमुख, वक्तृत्व व वादविवाद मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| प्रा. सायली समुद्रे | डॉ. चंद्रशेखर दवणे | प्रा. अमोल लांडगे | प्रमोद घोडके |
| सदस्या | सदस्य | सदस्य | अध्यक्ष, वक्तृत्व व वादविवाद मंडळ |
| मो. ९४२३७७६५४८ | मो. ९३२५६२०२८३ | मो. ८४८५८०७५२८ | मो. ९३२५३३९४८३ |

### : स्पर्धा संपर्क समिती :

| | | |
|---|---|---|
| डॉ. भीमराव पाटील | कु. प्रतिक्षा मोरे | विशाल कांबळे |
| मो. ९८५०७९६७५५ | मो. ९३२२३२१४९८ | मो. ९४०४३८९१७९ |
| अक्षित हेरकर | कु. वर्षा चव्हाण | आदित्य दराडे |
| मो. ७०२०५४७४६६ | मो. ७३८५२७५३७० | मो. ९०४९६०८३९७ |

### : स्पर्धेचे ठिकाण :

## राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

व्ही.एल.सी. हॉल

# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

वक्तृत्व व वादविवाद विभागाद्वारा आयोजित

२ जानेवारी २०२३



**भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव**
**व**
**राजर्षी शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्षानिमित्त**

वर्ष ४ थे

आज़ादी का अमृत महोत्सव

# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा



: जन्म :
२३ एप्रिल १८७३

: निर्वाण :
२ जानेवारी १९४४

**स्पर्धा दिनांक : २ जानेवारी २०२३**

वेळ : सकाळी ९ वा., व्ही.एल.सी. हॉल

प्रति,
प्राचार्य, ____________________
____________________
____________________
____________________

**मा. प्राचार्य,**
**म.न.वि.वि.**

शैक्षणिक गुणवत्तेसाठी 'शाहू पॅटर्न' 'लातूर पॅटर्न' या नावाने महाराष्ट्र व देशात प्रसिद्ध असलेल्या राजर्षी शाहू महाविद्यालयातील 'वक्तृत्व व वादविवाद' विभागाने विद्यार्थ्यांच्या कलागुणांच्या विकासाचा सातत्याने ध्यास घेतला आहे. वक्तृत्व व वादविवाद विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी निबंध, वक्तृत्व, वादविवाद, चित्रकला स्पर्धा, वाचन व लेखन स्पर्धा, वैचारिक अभिवादन स्पर्धा, विवेकवाहिनी व संविधान दिन जनजागृती यांसारखे व्यक्तिमत्व विकासाचे उपक्रम राबविले जातात. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना संधी दिली जाते. त्यांच्यातील अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडले जातात. 'राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा' हा त्यापैकीच एक उपक्रम आहे. राज्यभरातील विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होण्यासाठी आम्ही या वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून 'हक्काचं विचारपीठ' उपलब्ध करून देत आहोत.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त व राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृतिशताब्दी वर्षाच्या निमित्ताने या वर्षी राजर्षी शाहू महाराजांच्या जीवन व कार्यावर आधारीत वक्तृत्व स्पर्धेचे विषय देण्यात आले आहेत. या स्पर्धेचे हे 'चौथे' वर्ष आहे. महाराष्ट्राला पुरोगामी विचारांचा वारसा लाभला आहे. हा वारसा येथील पुरोगामी विचारवंत व समाजसुधारकांनी समृद्ध बनविलेला आहे. याच पुरोगामी समाजसुधारकांच्या मालिकेतील एक 'नवतारा' म्हणजेच 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे' हे होत. ते द्रष्टे व कृतीशील समाजसुधारक होते. दिनांक २३ एप्रिल १८७३ रोजी कर्नाटकातील 'जमखंडी' येथे त्यांचा जन्म झाला. मुंबई विद्यापीठातून बी.ए. ची पदवी प्राप्त केल्यावर त्यांनी सामाजिक सुधारणा चळवळीत सहभाग घेतला. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्त्री शिक्षण, अस्पृश्यता निर्मूलन, मद्यपान बंदी, शेतकरी विकास योजना, दुष्काळ निवारण, मुरळी प्रतिबंधक चळवळ आणि धर्मसुधारणा चळवळीत सक्रीय सहभाग घेऊन सामाजिक बदल घडवून आणले. अखेर २ जानेवारी १९४४ रोजी पुणे येथे त्यांचे निर्वाण झाले. त्यांच्या पुरोगामी विचार व कार्याची ओळख युवा वक्त्यांना व्हावी या उद्देशानेच या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सध्याचे युग खऱ्या अर्थाने स्वतःला व्यक्त करण्याचे आहे. संवाद व संभाषण कौशल्यामुळे विद्यार्थी सभाधिट होतात वा कौशल्यकलेत पारंगत होतात. त्यांच्यातूनच पुढे विविध क्षेत्रात नेतृत्त्व करणारे अष्टपैलू वक्ते निर्माण होतात. युवकांच्या विचारशक्तीला उत्तेजना मिळून महाराष्ट्राचा बौद्धिक आणि वैचारिक वारसा अधिक समृद्ध व्हावा म्हणून आम्ही या वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून युवकांच्या हक्काचं विचारपीठ उपलब्ध करून देत आहोत. तरी आपल्या महाविद्यालयातील एक किंवा दोन विद्यार्थ्यांचा संघ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पाठवून सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

॥ वक्तृत्त्व नेतृत्त्वाचा पाया आहे ॥

## स्पर्धेचे नियम व अटी :

१. ही स्पर्धा महाराष्ट्रातील कनिष्ठ, पदवी व पदव्युत्तर महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांकरिता असेल.
२. प्रत्येक स्पर्धकास ५+२=७ मिनिटांचा वेळ दिला जाईल.
३. प्रवेश नोंदणी करताना स्पर्धकाजवळ महाविद्यालयाचे ओळखपत्र, आधारकार्ड व लेटरपॅडवरील प्रवेशपत्र असणे बंधनकारक आहे. व्हॉट्सॲपवरील प्रवेशपत्र स्वीकारले जाणार नाही.
४. स्पर्धा सकाळी ठीक ९.०० वाजता सुरू होईल.
५. स्पर्धकाचे वय २३ वर्षांपेक्षा अधिक नसावे.
६. प्रत्येक स्पर्धकास २०० रूपये प्रवेश शुल्क आकारण्यात येईल.
७. परीक्षकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.
८. प्रत्येक महाविद्यालयास एक किंवा दोन स्पर्धक पाठवता येतील.
९. ऐनवेळी स्पर्धेच्या नियमांत बदल करण्याचा हक्क संयोजन समितीला राहील.
१०. नियमीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाच या स्पर्धेत भाग घेता येईल. मुक्त विद्यापीठ आणि बहिस्थ शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या स्पर्धेत भाग घेता येणार नाही.
११. स्पर्धकांनी ३० डिसेंबर २०२२ पर्यंत संयोजकांकडे नाव नोंदणी करावी.
१२. बनावट ओळखपत्र, आधार कार्ड व प्रवेशपत्र देऊन प्रवेश घेणा-या स्पर्धकांवर कायदेशीर कार्यवाही केली जाईल.
१३. स्पर्धकाच्या दुपारच्या एका वेळेसच्या भोजनाची व्यवस्था करण्यात येईल.
१४. मुलींची निवास व्यवस्था मुलींच्या वसतिगृहात केली जाईल. त्यासाठी एक दिवस अगोदर फोन करून कळविणे अनिवार्य आहे.

## वक्तृत्व स्पर्धेचे विषय :

१) सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ : राजर्षी शाहू महाराज
२) राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य
३) राजर्षी शाहू महाराजांचे शेती, कला आणि उद्योगविषयक धोरण
४) राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक न्यायाचे धोरण
५) स्त्री उद्धारक : राजर्षी शाहू महाराज
६) सामाजिक समतेचे पुरस्कर्ते : राजर्षी शाहू महाराज
७) पुरोगामी समाजसुधारक : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

## पारितोषिके




प्रथम : ७००० रू., शाहू करंडक व प्रशस्तीपत्र
द्वितीय : ५००० रू., स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र
तृतीय : ३००० रू., स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र
उत्तेजनार्थ : १००० रू. ची दोन पारितोषिके, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र

सकाळ | लातूर
औरंगाबाद, बुधवार, २८ डिसेंबर २०२२
TODAY
SakalNews @SakalMediaNews www.esakal.com Call Centre : 9225800800

# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

लातूर, ता. २७ : राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या वतीने दोन जानेवारी रोजी सकाळी नऊ वाजता व्हीएलसी सभागृहात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा होणार आहे. स्पर्धेसाठी सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ : राजर्षी शाहू महाराज, राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य, राजर्षी शाहू महाराजांचे शेती, कला आणि उद्योग विषयक धोरण, राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक न्याय धोरण, स्त्री उद्धारक : राजर्षी शाहू महाराज, सामाजिक संस्थेचे पुरस्कर्ते : राजर्षी शाहू महाराज व पुरोगामी समाजसुधारक : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यापैकी कोणत्याही एका विषयावर स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.